# अस्तित्व ॲकॅडमी.....ओळख स्वतःची

**MPSC / UPSC / BANKING / PSI / STI / ASO**

**Email.: astitva.lucky@gmail.com**

**✼ महाराष्ट्र लोकसेवा आयोग : पोलीस उपनिरीक्षक (P.S.I.) मुलाखतीचे अपेक्षित प्रश्न व उत्तरे ✼**

१. पोलीसांचे आदयकर्तव्ये कोणती?

उत्तर : १) कायदा व सुव्यवस्था राखणे
२) गुन्ह्यांना प्रतिबंध घालणे
३) घडलेल्या गुन्ह्याचा तपास करणे
४) गुन्हेगारास अटक करून त्या विरूध्द योग्य तो पुरावा गोळा करणे व त्यास न्यायालयासमोर हजर करणे

२) यशस्वी पोलीस अधिकारी होण्यासाठी आवश्यक गुण कोणते?

उत्तर : १) धैर्य, अचूक निरिक्षण शक्ती, चिकाटी, चांगली आकलन क्षमता, कायद्याचे अचून ज्ञान, परिश्रम करण्याची तयारी व उत्तम जनसंपर्क.

३) पोलीसांचे बोधवाक्य काय आहे?

उत्तर : सद्रक्षणाय खलनिग्रणाय.

४) सद्रक्षणाय खलनिग्रणाय, या बोधवाक्याचा अर्थ माहिती आहे का? सांगा.

उत्तर : सज्जनांचे रक्षण व दृष्टांचा संहार

अस्तित्व ॲकॅडमी, नाशिक

५) गुन्हेगारी रोखण्यासाठी पहिली सोशल मिडीया लॅब कोठे स्थापन करण्यात आली?

उत्तर : चंद्रपुर येथे.

६) राज्यातील मुलींचा घटता जन्मदर याचे प्रमुख कारण काय?

उत्तर :

७) इंदूर पॅटर्न म्हणजे काय?

उत्तर : गर्भलिंग निदान चाचणी व स्त्रिभ्रुण हत्येला आळा घालण्यासाठी सर्वप्रथम इंदुर येथे सर्व सोनोग्राफी सेंटर्समध्ये ॲक्टीव्ह ट्रॅकर यंत्रणा बसविण्यात आली हा प्रयोग यशस्वी झाला म्हणून इतर राज्यातही हा राबविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. यालाच इंदूर पॅटर्न असे म्हणतात.

७) आपले सरकार बेब पोर्टल काय आहे?

उत्तर : राज्यातील जनतेला थेट मंत्रालयाशी संपर्क साधणारी ही ऑनलाईन व्यवस्था असून या पोर्टलद्वारे नागरिकांना आपल्या तक्रारी ऑनलाईन दाखल करण्याची व त्याची सदःस्थिती जाणून घेण्याची सुविधा असल्याने मंत्रालयापर्यंत येण्याची आवश्यकता भासणार नाही.

८) वेबपोर्टल ची सरंचना सांगा.

उत्तर : १) तक्रार निवारण २) माहिती अधिकार ३) सहयोग ४) सार्वजनिक सेवा

९) राष्ट्रीय विधी विदयापीठ यांनी सादर केलेल्या २६२ वा अहवाल कशा संदर्भात आहे? थोडक्यात माहिती सांगा.

उत्तर : देहांताची शिक्षा यावर आधारित आहे / फाशीची शिक्षा या बाबत हा अहवाल आहे.

माहिती :

१) राष्ट्रीय विधी विदयापीठ यांनी २०१४ मध्ये देहांत शिक्षा प्रकल्पाची सुरूवात केली.

२) यामध्ये देशातील २० राज्य व अंदमान निकोबार या केंद्रशासित प्रदेशामधील सर्व फाशीची शिक्षा झालेल्या कैद्यांच्या व नातेवाईकांच्या मुलाखती घेतल्या.

३) डॉ.अनुप सुरेंद्रनाथ यांच्या नेतृत्वाखाली हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

४) दशहतवाद माजवणे व देशाविरूध्द युध्द पुकारणे या बाबी वगळता इतर सर्व गुन्ह्यांसाठी फाशी रद्द व्हावी अशी शिफारस / मत आयोगाने नोंदविले.

९) आय.पी.सी नुसार राजद्रोह म्हणजे काय?

उत्तर : भारतामध्ये कायदेशीर स्थापन झालेल्या शासनाबद्दल द्वेशाची किंव तुच्छतेची भावना निर्माण करणे किंवा तसा प्रयत्न करणे अथवा अप्रतीची भावना चेतवितो किंवा प्रयत्न करतो ती व्यक्ती आय.पी.सी. च्या कलमात १२४ –अ नुसार राजद्रोह हा गुन्हा ठरतो.

१०) राजद्रोह सिध्द झाल्यास शिक्षेची तरतुद सांगा.

उत्तर : दखलपात्र, अजामिनपात्र गुन्हा असून आजीवन कारावास व रूपये च्या स्वरूपात दंड / तीन वर्षाचा कारावास / पैशाच्या स्वरूपात दंड होवू शकतो.

११) ब्युरोस ऑफ पोलिस रिसर्च ॲण्ड डेव्हलमेंटनुसार किती नागरिकांमागे १ पोलिस तैनात आहे (अहवालानुसार)

उत्तर : ६६३ नागरीकांमागे १ पोलिस तैनात आहे.

१२) ब्युरोस ऑफ पोलिस रिसर्च ॲण्ड डेव्हलमेंट महाराष्ट्रामध्ये किती नागरीकांमागे एक पोलिस आहे.

उत्तर : ९६१ नागरिकांमागे एक पोलिस

१३) सर्वाधिक व्हीआयपीची संख्या कोणत्या राज्यात आढळते?

उत्तर: बिहार (सर्वात कमी केरळ)

अस्तित्व ॲकॅडमी, नाशिक

१४) कोणत्या राज्यात व्हिआयपी सेवा पुरवली जात नाही?

उत्तर : लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशात

१५) सी.बी.आय. म्हणजे काय?

उत्तर : सेंट्रल ब्युरो ऑफ इन्हेस्टीगेशन ही केंद्र सरकारची पोलिस संघटना आहे.

१६) सी.बी.आय. ची कर्तव्ये कोणती/कर्तव्ये सांगा.

उत्तर : १) नोकरीत असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना गैरवर्तनाची चौकशी करणे.

२) केंद्र सरकार ने सुपुर्त केलेल्या गुन्हांचा तपास करणे.

३) मोठया प्रमाणात फसवणुक, पैशांची आफरातफर, यांची चौकशी करणे.

४) केंद्र सरकारच्या कायदयाचे उल्लंघन करणारे गुन्हे तपासणे

५) संघटित गुन्हेगारांची गुन्हे (अनेक राज्य मिळुन) यांचा तपास घेणे.

६) इंटरपोल व भारतीय पोलिस यांमधील एक दुवा म्हणून कामकाज पाहणे.

१७) Police या शब्दाचा अर्थ सांगा.

उत्तर :

P = Plitenese (Towards to people)
O = Obedience (Towards to superiors)
L = Loyalty (Towards constitution and nation)
I = Intergrity (Towards duty)
C = Courage (To deal with criminals)
E = Efficiency (In work)

१८) पोलिस व नागरिक यामधील संबंध तनावपुर्वक असण्याची कारणे ?

उत्तर : १) पोलिस दलातिल कर्मचारी यांच्या कामाचे स्वरूप पाहता अधिक तास डयुटी, सतत गुन्हेगारी जगाशी संपर्क, मानसिक दबाव, शारीरिक मानसिक त्रास याकारणांची तक्रार करण्यासाठी आलेल्या व्यक्तीसोबत गैरव्यवहार, रागाने बोलने, काशास टाळाटाळ करणे कशा वर्तणुकीमुळे पोलिस व जनता यांच्यातील संबंध तनावपूर्वक बनतात. तसेच जनतेला पोलिसांच्या कामाचे स्वरूप, मर्यादा यांच्या बाबत अज्ञान असल्याने पोलिसांविषयी गैरसमज निर्माण होतो. चित्रपट नेहमीच गैरवर्तन करणारे अकार्यक्षम दाखविण्यात येतात याचाही परिणाम जनतेच्या मनावर थेट होतो.

१९) पोलिस व जनता यांच्यातील संबंध सुधारण्यासाठीचे उपाय सांगा.

उत्तर : १) जनतेसोबत गैरवर्तवणुक टाळून त्यांच्या तक्रारीचे निराकारण करण्याचा संपूर्ण प्रयत्न करावा पुर्णपणे निराकारण करता आले नाही तरी त्यांच्या सोबत सभ्यतेने वर्तनुक करून त्यांना समजावुन सांगावे. २) पोलिसांच्या मर्यादेची / कायदेनुसार कामकाजाची पध्दत जनतेला समजुन सांगावी यासंदर्भात शंका निरसन करावे.

२) राजकीय नेत्यांची, कार्यकर्त्यांची जबाबदारी त्यांना सांगून कायदयाप्रमाणे काम करावे याने जनतेचा विश्वास वाढेल

३) चित्रपटातील पोलिसांच्या भुमिकेला विकृत दाखविले असता कडक कार्यवाही करावी. चित्रपटाद्वारे पोलीसांवरील विश्वास वाढेल असा प्रयत्न करावा.

४) वर्तमानपत्र, माहितीपत्र याद्वारे पोलिसांच्या चांगल्या कामगिरीची प्रसिध्दी व्हावी तसेच वृत्तपत्रांनी निपक्षपातीपणे लोकांना पोलिसांची भूमिका मांडावी.

२०) महाराष्ट्र पोलिस दलातील अधिकाऱ्यांना कोठे प्रशिक्षण दिले जाते ?

उत्तर : महाराष्ट्र पोलिस अकादमी नाशिक येथे

२१) महाराष्ट्र पोलिस दल प्रकाशित करत असलेल्या लोकप्रिय मासिकाचे नाव माहित आहे का ?

उत्तरः हो सर , महाराष्ट्र पोलिस दल दक्षता हे लोकप्रिय मासिक प्रकाशित करीत असते.

अस्तित्व अॅकॅडमी, नाशिक

२२) राष्ट्रीय छात्रसेना मध्ये भाग घेतला होता का ?

उत्तरः हो सर

२३) राष्ट्रीय छात्रसेनेचा उद्देश काय आहे ?

उत्तरः राष्ट्रीय छात्रसेनेचे तीन उद्देश आहेत.

१) नेतृत्व, चारित्र, सहकार्य, खिलाडुवृत्ती यांचा विकास घडून आणणे.

२) राष्ट्रीय आपत्कालीन स्थितीत देशाला सहाय्य करू शकेल अशी शिस्तबध्द व प्रशिक्षित जनशक्ती निर्माण करणे

३) विदयार्थीमध्ये अधिकारी बनन्या योग्य गुणांचा विकास करणे व त्यांना प्रशिक्षण देवून सैन्यदलात जाण्यासाठीचा मार्ग सुकर करणे.

२४) राष्ट्रीय छात्रसेना चे ध्येय वाक्य सांगा.

उत्तर : एकता व अनुशासन

२५) पोलिस विभागाकडे काही केसेस येतात यामध्ये एखादया महिलेवर बलात्कार होतो व नंतर सेटलमेंट होवून त्यांचे लग्न लावले जाते योग्य आहे का ?

उत्तर : १) सर मला हे चुकीचे वाटते. यामध्ये एक तर महिलेचा जोडीदार निवडीचा हक्क नाकारला जातो आणि या गुन्हेगाराने तिच्यावर अत्याचार केला आहे त्यासोबतच तिला उर्वरीत आयुष्य जगावे लागते हा तिच्यावर पुन्हा बलात्कार आहे.

२६) महाराष्ट्रात औदयोगिकरणाचे प्रमाण वाढले आहे. औदयोगिकरण व बेरोजगारी संबंध सांगा.

उत्तर : औदयोगिकरणामुळे रोजगार वाढतो व दारिद्रय कमी होते.

२७) नक्षलवादी चळवळीमध्ये महिलांचा सहभाग का वाढतो? त्यांची कारणे सांगा.

उत्तर : मुळातच हा शोषित आणि शोषणकर्ते यांच्यातील वर्गसंबंध आहे आणि महिला शोषणाला बळी ठरणारा सर्वात मोठा घटक आहे त्यामुळे प्रतिकाराच्या व बदल्याच्या भावनेने त्या त्या नक्षलवादी चळवळीत सहभागी होतात.

२८) तुम्ही पीएसआय आहात त्या चौकीवर बेकायदेशीर जमाव आला तर काय कराल?

उत्तर : सर, सदर बेकायदेशीर जमाव आला तर सर्वात प्रथम कंट्रोल रूम व वरिष्ठ पोलिस निरिक्षकांना कळविन. जमाव हिंसक नसल्यास त्यांचे पुढारी म्हणून जे असतील त्यांचे मोर्चे काढण्याचे कारण विचारून तक्रार निवारण्याचे काम करेल. जमाव हिंसक असेल तर सीआरपीसी -१२९ प्रमाणे कार्यवाही करेन.

२९) सीआरपीसी-१२९ प्रमाणे कार्यवाही म्हणजे काय?

उत्तर : सीआरपीसी-१२९ प्रमाणे कार्यवाही म्हणजे जर बेकायदेशीर जमाव आला तर त्या जमावास सर्वप्रथम आपण बेकायदेशीर असल्याचे खात्री पटवुन देईल व माझ्याकडील उपलब्ध मनुष्यबळाप्रमाणे कार्यवाही करेन. उदा. आश्रृधुर, फायरिंग, लाठीचार्ज करेन किंवा स्टेप बाय स्टेप सर्व कार्यवाही करेन. केलेल्या सर्व कार्यवाहीचा अहवाल कंट्रोल रूम व पी.आय / वरिष्ठांना कळवेल व जखमिंना इस्पितळात नेईल व शक्य तेवढया व्यक्तींना अटक करून गोपनीय ठिकाणी नेईल.

३०) दशहतवादाची व्याख्या सांगा.

उत्तर : राजकीय व धार्मिक हेतुने वेगवेगळया मार्गाने लोकांच्या मनात दशहत निर्माण करणे/ करण्यासाठी हिंसक कार्यवाही / हिंसक कृत्य करणे म्हणजे दशहतवाद.

३१) महिला अधिकारी प्रशासनात जास्त प्रभावी ठरतात असे तुम्हाला वाटते का?

उत्तर : सर, अधिकारी हा मुळात त्याच्या कामातुन जास्त प्रभावी ठरू शकतो त्यामध्ये तो पुरूष आहे कि महिला असा भेद गौण ठरतो.

अस्तित्व अॅकॅडमी, नाशिक

३२) महिला सुरक्षतेबाबात तुम्ही पोलिस व कायदे या व्यतिरिक्त काय कराल ते सांगा.

उत्तर : सुरक्षतेची मुख्य जबाबदारी हि स्त्री ची आहे या करिता बी अलर्ट व बी कॉन्फीडेंट राहण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन महिलांमध्ये करेन.

३३) याला सविस्तर सांगा.

उत्तर : सर, म्हणजे रात्रीचे वेळी सुनसान जागी ऑफीसच्या ठिकाणी जीपीएस लोकेशन ऑन ठेवणे हेल्पलाईन नंबर मोबाईल मध्ये ॲप मोबाईलमध्ये ठेवणे आणि त्याचा वापर कसा करावा याचे मार्गदर्शन करेन.

बी प्रीपेअर म्हणजे कि स्व-संरक्षणाचे धडे जसे कराटे, बॉक्सींग इ. चित्रफीतीद्वारे महिलांसमोर मांडेल व त्यांना मार्गदर्शन करेल.

३४) मला सांगा पोलीस प्रशासन कुठल्या ॲक्ट वर काम करतात?

उत्तर : सर, पोलीस प्रशासन IPC (Indian Pinal Code) आणि CRPC (Criminal Procedure Codes) या ॲक्टवर काम करतात तसेच Indian evidence act's आणि forensics act नुसार हि काम करतात.

३५) Water Conservation मध्ये कोणत्या संस्था कार्यरत आहेत.

उत्तर : सर, या NAAM Foundation, Water Foundations या आहेत.

३६) जलयुक्त शिवार योजना काय आहे?

३७) महाराष्ट्र राज्याच्या सध्याच्या प्रमुख समस्या काय आहेत?

उत्तर : शेतकरी आत्महत्या, भुजलाचा वेगाने होणार ऱ्हास, बेरोजगारी प्रादेशीक असमतोल, औदयोगिक क्षेत्रातील समस्या या महाराष्ट्रातील प्रमुख समस्या आहेत.

३८) महाराष्ट्र राज्याच्या सध्याच्या प्रमुख समस्या काय आहेत?

उत्तर : शेतकरी आत्महत्या, भुजलाचा वेगाने होणार ऱ्हास, बेरोजगारी प्रादेशीक असमतोल, औदयोगिक क्षेत्रातील समस्या या महाराष्ट्रातील प्रमुख समस्या आहेत.

३९) तुम्हाला प्रशासनात का यायचे आहे?

उत्तर : प्रशासनात लोकांची सेवा करायची संधी मिळते, प्रशासनाचे काम हे Challenging आणि Dynamic असते तसेच समाजात मान सन्मान ही मिळतो.

४०) लोकशाहीचे स्तंभ सांगा.

उत्तर : १) कार्यकारी मंडळ २) विधानमंडळ ३) न्यायमंडळ/न्यायपालिका ४) मिडीया/वृत्तपत्र

४१) मिडीयाला चौथा आधार स्तंभ का म्हणतात?

उत्तरः सर कार्यकारी मंडळ, विधिमंडळ, न्यायमंडळ या तिन्ही स्तंभाची माहिती हि जनतेसमोर/जनतेकडे पोहचविण्याचे काम मिडीया करते तसेच जनतेचे प्रश्न, समस्या यांना वरिल स्तंभापर्यत पोहचवते.

४२) राष्ट्रीय सेवा योजना बद्दल माहिती सांगा.

उत्तर : राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधुन शिक्षण खात्याने १९६९-७० या वर्षात राष्ट्रीय सेवा योजना सुरू केली. सुरवातीला योजना ३७ विदयापिठात राबविण्यात आली.

४३) राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय / उद्दीष्टये सांगा / माहिती सांगा.

उत्तर : समाजसेवेच्या माध्यमातून विदयार्थ्यांचे व्यक्तीमत्व विकास व्हावे त्याच्यात सामाजिक जाणिव व जागृती करावी. सामाजिक समस्या सोडविणे, लोकांसोबत काम करणे, नेतृत्व गुण विकास करणे, दुर्बल घटकांची सेवा करण्याची भावना निर्माण करणे हे प्रमुख ध्येय / उद्दीष्टये आहेत.

अस्तित्व अॅकॅडमी, नाशिक

४४) NCC चे ध्येय वाक्य काय आहे?

उत्तर : सर, NOT ME BUT YOU हे आहे

४५) राष्ट्रीय सेवा योजनेची काम कोणत्या विभागामार्फत नियंत्रित केले जाते / पाहिले जाते?

उत्तर : भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या युवा व क्रिडा विभागामार्फत पाहिले जाते.

४६) महाविद्यालय स्तरावर एनसीसी चे कामकाज कोण पाहते? नियंत्रण कोणाचे असते?

उत्तर : महाविद्यालय स्तरावर मा.प्राचार्य तसेच मा.कार्यक्रम अधिकारी हे कामकाज पाहतात. (विदयापीठ असेल तर मा.कुजगूर तसेच मा. समन्वयक पाहतात.)

४७) NCC चे राष्ट्रीय चिन्ह/ बोधचिन्ह सांगा/ कोणते आहे?

उत्तर : ओरिसातील कोणार्कच्या सुर्यमंदिरातील रथाचे चक्र हे राष्ट्रीय चिन्ह आहे. हे चक्र जीवनाच्या प्रगतीचे चक्र आहे.

४८) बुलेट ट्रेन भारतात असावी का? बुलेट ट्रेन ची एकुण स्थानके किती? महाराष्ट्रात किती? (१२ व ४ स्थानके)

४९) महाजन आयोग माहित आहे का? कशाबाबत नेमण्यात आला होता?

उत्तर : महाराष्ट्र - कर्नाटक सिमावाद सोडविण्यासाठी एकसदस्यीय महाजन आयोग नेमण्यात आला होता.

५०) महाराष्ट्र - कर्नाटक सिमावाद नेमका काय आहे?

उत्तर : महाराष्ट्र व कर्नाटक सिमावाद हा भाषेच्या मुद्दयावरून आहे. महाराष्ट्रातील दक्षिण व कर्नाटकचा उत्तर भाग हे या वादाचे अग्रस्थानी आहे. कर्नाटकने सोलापूर जिल्ह्यावर तर महाराष्ट्राने खानापूर, निपाणी आणि बेळगाव शहरांसहित बेळगाव जिल्हा, कारवार, उत्तर कर्नाटक, औशद, बसवकल्याण यासमवेत बिदर या मराठी भाषिक क्षेत्रावर दावा केला आहे.

***